CMYK

बर्ड फ्लू संसर्ग प्रतिबंधासाठी सर्व विभागांनी दिलेल्या सूचनांची प्रभावी अंमलबजावणी करावी - कुमार आशीर्वाद (जिल्हाधिकारी)
>> पान 2

औरंगजेबाची ढाल करुन काही लोक दंगल उसळत आहेत : खा. संजय राऊत यांचा पत्रकार परिषदेत आरोप
>> पान 3

डोणगाव मंडळातील रस्त्याने घेतला मोकळा श्वास
>> पान 4

**सुविचार**
मराठी: संयम हा यशाचा महत्त्वाचा घटक आहे.

दैनिक
# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com
मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034




म्हणत प्रसिद्ध खलनायिका रुपाली भोसलेनं शेअर केला VIDEO, होतंय कौतुक
आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 215 ■ बुधवार, दि. 19 मार्च 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# मतदार कार्ड आधारशी लिंक करण्याची तयारी

**नवी दिल्ली : पॅन कार्ड आणि आधार कार्ड लिंकिंगनंतर आता निवडणूक आयोगाने मोठा निर्णय घेतला आहे. आता मतदानकार्ड हे आधार कार्डसोबत लिंक करण्यात येणार आहे. सर्वोच्च न्यायालयाचे निकाल आणि घटनेतील तरतुदीनुसार निवडणूक आयोगाने हा निर्णय घेतला आहे. आज दिल्लीत झालेल्या बैठकीत याबाबतचा निर्णय घेण्यात आला असून लवकरच यासंदर्भात तज्ज्ञांसोबत सल्लामसलत सुरू होणार आहे.**

## निवडणूक आयोग-गृह मंत्रालयाच्या बैठकीत निर्णय; प्रक्रियेवर तज्ज्ञांची चर्चा लवकरच सुरू होईल

मतदार नोंदणी क्रमांकसोबत आधार क्रमांक लिंक करण्यात येणार आहे. याबाबत लवकरच तज्ज्ञांसोबत सल्लामसलत होईल. सर्वोच्च न्यायालयाचे निकाल आणि घटनेतील तरतुदीनुसार निर्णय घेतल्याची माहिती आयोगाने दिली आहे. आधार कार्ड फक्त ओळख प्रस्थापित करणारी व्यवस्था आहे, त्याचा संबंध नागरिकत्वाशी नाही. मतदानाचा अधिकार फक्त नागरिकांनाच आहे. एझखउ ला आधारशी जोडण्यासाठी निवडणूक आयोगाकडून कलम ३२६, आरपी कायदा, १९५० आणि संबंधित सर्वोच्च न्यायालयाच्या निकालांचा आधार घेऊन कारवाई करण्यात येणार आहे. दरम्यान, याबाबत युआयडीएआय आणि निवडणूक आयोगाच्या तज्ञांमध्ये तांत्रिक सल्लामसलत लवकरच सुरू होणार आहे.

भारतीय संविधानातील अनुच्छेद ३२६ नुसार मतदानाचा अधिकार फक्त भारतीय नागरिकांनाच दिला जाऊ शकतो. आधार कार्डच्या मदतीने एखाद्या व्यक्तीची ओळख समजू शकते. त्यामुळेच मतदान कार्ड आणि आधार क्रमांक लिंक केले जाणार आहेत. ही सर्व प्रक्रिया संविधानातील अनुच्छेद ३२६ नुसार तसेच लोकप्रतिनिधी कायदा १९५० च्या कलम २३(४), २३(५) व २३(६) आणि सर्वोच्च न्यायालायाने दिलेल्या निर्णयाच्या अधीन राहूनच केली जाईल. लवकरच णखऊ-ख आणि भारतीय निवडणूक आयोगाच्या तांत्रिक तज्ज्ञांसोबत याबाबत सल्लामसलत केली जाईल.

**का घेतला हा निर्णय?**

सध्या अनेक ठिकाणी एकाच मतदाराची नावे वेगवेगळ्या ठिकाणी नोंद होण्याचे प्रकार समोर आले आहेत. तसेच, बोगस मतदार ओळखणे आणि बनावट मतदान रोखण्यासाठी सरकार आणि निवडणूक आयोगाकडून विविध उपाययोजना केल्या जात आहेत. आधार कार्ड लिंकिंगमुळे प्रत्येक मतदाराची ओळख निश्चित करता येईल आणि निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता आणता येईल.



या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी निवडणूक आयोग लवकरच तज्ज्ञ आणि कायदेतज्ज्ञांसोबत चर्चा करणार आहे. केंद्र सरकारकडून यासाठी आवश्यक तांत्रिक सुधारणा करण्यात येतील. याबाबत लवकरच मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केली जातील. मतदारांना त्यांचे आधार कार्ड लिंक करण्यासाठी एक निश्चित कालावधी दिला जाईल, तसेच, ऑनलाईन आणि ऑफलाईन पद्धतीने ही प्रक्रिया पार पडणार आहे.

निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे की, आधार कार्ड हे केवळ ओळख प्रस्थापित करणारे साधन आहे आणि त्याचा भारतीय नागरिकत्वाशी कोणताही संबंध नाही. त्यामुळे केवळ भारतीय नागरिकांनाच मतदानाचा अधिकार असेल. यासोबतच, नागरिकांची गोपनीयता आणि वैयक्तिक माहिती सुरक्षित ठेवण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घेतली जाईल.

**मतदान प्रक्रियेत काय बदल होणार?**

बोगस मतदानाला आळा - आधार लिंकिंगमुळे नकली मतदार ओळखणे सोपे होईल.

एकाच मतदाराची अनेक ठिकाणी नोंद टाळली जाईल - मतदार यादी अधिक स्वच्छ आणि विश्र्वासार्ह होईल.

मतदान प्रक्रियेत पारदर्शकता वाढण्यास मदत - निवडणुका अधिक विश्र्वासार्ह आणि योग्य पद्धतीने पार पडतील.

आधार लिंकिंगच्या या निर्णयामुळे निवडणुकीची प्रक्रिया अधिक पारदर्शक होईल. बोगस मतदान रोखण्यास मदत होईल आणि प्रत्येक मतदाराची ओळख निश्चित करता येईल. मात्र, या प्रक्रियेत कोणत्याही मतदाराला अडचण येणार नाही, याची दक्षता घेणे आवश्यक आहे. आता नागरिक आणि राजकीय पक्ष या निर्णयावर कसा प्रतिसाद देतात, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.




## आरेगाव जलजीवन मिशन योजना

# संशयाच्या भोवऱ्यात

## विहीर खोदकामासाठी ६ लक्ष रूपये खर्च, विहीर मात्र कोरडी

## प्रशासनाच्या सावळ्या गोंधळात लाखोंचा निधी व्यर्थ खर्च..?

**दैनिक आपला विदर्भ**

**मेहकर. आरेगाव गावातील माय माऊलींच्या डोक्यावरील पाण्याचा हंडा खाली उतरावा, यासाठी तब्बल एक कोटी ९९ लाख रुपये निधी मंजूर करून जल जीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा करण्याच्या कामाला दोन वर्षांपूर्वी प्रारंभ करण्यात आला होता. मात्र, प्रशासकीय कारभाराच्या सावळ्या गोंधळात ही पाणीपुरवठा योजना रखडली असून तब्बल सहा लाखांवर निधी व्यर्थ खर्च.? अधिकाऱ्यांनी शासनाला चुना लावण्याचे काम केले.? आरेगाव येथील जलजीवन मिशन योजनेच्या कामात मोठ्या प्रमाणात सावळा गोंधळ सुरू असल्याने जल जीवन मिशन योजनेचे कामे संशयाच्या भोवऱ्यात आले आहे. याकडे लोकप्रतिनिधींनी दुर्लक्ष करत तोंडावर बोट ठेवल्याने नागरिकांमध्ये आश्र्चर्य व्यक्त केल्या जात आहे. एरवी गोरगरीब जनतेला वेठीस धरणारे अधिकारी, पदाधिकारी यांना शासनाचा लाखो रुपयांचा निधी व्यर्थ खर्च होत असताना दिसत नाही की काय ? असा प्रश्न जनता उपस्थित करत असून या प्रकरणात दोषी असणाऱ्या अधिकाऱ्यांना निलंबित करत व्यर्थ खर्च झालेली रक्कम वसूल करण्याची मागणी जनतेकडून होत आहे.**

मेहकर तालुक्यातील आरेगाव येथील पाणीटंचाई कायमस्वरूपी निकाली निघावी, यासाठी शासनाच्या वतीने पाणीपुरवठा योजनेअंतर्गत तब्बल १ कोटी ९९ लाख ९ हजार रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. सदर निधी अंतर्गत ८ ऑगस्ट २०२२ रोजी कामास कार्यारंभ करण्याचा आदेश देण्यात आला होता व पाणीपुरवठा योजनेचे काम हे १८ महिन्यात पूर्ण करण्याचे अपेक्षित होते. तसेच या निधी अंतर्गत विहीर, पंपगृह, पंपिंग मशिनरी, मुख्य जलवाहिनी, पाण्याची टाकी, वितरण व्यवस्था आदी कामे करण्याचे अंदाजपत्रकात नमूद आहे.सदर कामाला दोन वर्षाच्या वर कालावधी झाला असताना यातील कामे अद्यापही अपूर्ण आहे. तब्बल एक कोटी ९९ लाख रुपयाचा निधी मंजूर असताना व यातील आतापर्यंत सहा लाखाच्यावर निधी खर्च केला असतानाही पाणीपुरवठा योजनेच्या कामाला अद्याप गती मिळाली नाही. त्यामुळे जल जीवन मिशन योजनेचे राबविणारे संबंधित अधिकारी काम करणारे ठेकेदार व या लोकांना पाठीशी घालणारे लोकप्रतिनिधी यांच्या बाबत मात्र जनतेमध्ये तीव्र रोष व्यक्त केला जात आहे. दोन वर्षांच्या नंतर सहा लाख रुपयांचा निधी खर्च करून सदर योजना रखडली असल्याने योजनेचे काम कधी पूर्ण होणार असा प्रश्न निर्माण झाला आहे. अरेगाव येथील पाणीपुरवठा योजना सुरू करण्याच्या अगोदर वरिष्ठ भूवैज्ञानिक भूजल सर्वेक्षण या विभागांतर्गत




पाण्याची पाहणी करण्यात आली. त्यानंतर तब्बल ५६ हजार रुपये खर्च करून कुपनलिका घेण्यात आली. तर, २४ लाख ६१ हजार ९३० रुपये विहिरीच्या कामासाठी निधी मंजूर करण्यात आला. यातील जवळपास पाच लाख ९२ हजार रुपये खर्च करून विहिरीचे खोदकाम करण्यात आले. मात्र, विहीर कोरडी गेल्याने सदर योजना रखडली आहे.त्यामुळे जलजीवन मिशनची योजना राबविणारे यंत्रणात संशयाच्या भोवऱ्यात अडकली आली आहे. कुपनलिका घेतल्याच्या नंतर विहीर कोरडी गेल्याने वरिष्ठ भूवैज्ञानिक सर्वेक्षण यांनी पाणी पाहणी केली की नाही हा प्रश्न निर्माण झाला आहे. कुपनलिका घेतली. नंतर विहीर कोरडी कशी गेली हा मोठा प्रश्नही निर्माण झाला आहे. कुपनलिका आणि विहीर खोदकाम झाल्याच्या नंतर काम रखडल्याने याकडे संबंधित वरिष्ठाचे लक्ष नव्हते का? असा प्रश्न जनता उपस्थित करीत आहे.साधारणतः दहा लाख रुपये किमतीचे विहिरीसाठी तब्बल २४ लाख ६१ हजार २३० रुपयाचा निधी कसा मंजूर केला असा प्रश्न उपस्थित होत आहे. विहीर खोदकाम किती ?, गोलाई किती?, खोलाई किती ? असे अनेक प्रश्न निर्माण होत आहेत.एकंदरीत आरेगाव येथील जल जीवन मिशन योजनेच्या कामात सावळा गोंधळ सुरू असून संपूर्ण यंत्रणाची संशयाच्या भोवऱ्यात आली आहे.या सर्वांवर नियंत्रण ठेवणारे अधिकारी, पदाधिकारी ही एकाच माळेतील मनी निघाल्याने जनतेचा अर्थात शासनाचा लाखो रुपयांचा निधी व्यर्थ खर्च होत असल्याचे चित्र मेहकर तालुक्यातील आरेगाव येथील जलजीवन मिशन योजनेच्या कामावरून दिसून येत आहे.



देविदास खनपटे
मुख्य संपादक

### दाल में कुछ काला नही पुरी दालच काली

आरेगाव येथील जलजवन मिशन योजनेतील सावळ्या गोंधळाने दोन वर्षापासून काम रखडलेले आहे. संबंधित अधिकारी, कर्मचारी, ठेकेदार लोकप्रतिनिधी आदी सर्वांची भूमिका ही शासनाला चुना लावण्याची राहिल्याने आरेगाव येथील जलजीवन मिशन योजनाही दाल में कुछ काला नही, पुरी दालच काली या म्हणीला साजेशी ठरत असल्याची चर्चा आरेगावसह संपूर्ण मेहकर तालुक्यात होत आहे. विहिरीच्या होत कामासाठी तब्बल २५ लखापर्यंत निधी मंजूर केला जात असताना व त्यातील सहा लाख रुपयांच्या वर निधी हा व्यर्थ खर्च केला जात असताना जल जीवन मिशन योजनेच्या अधिकाऱ्यांना व लोकप्रतिनिधींना जनतेच्या समस्येची काहीही सोयर सुतक नाही. शासकीय निधी खर्च करायचा आणि कमिशन स्वरूपात डल्ला मारायचा असा प्रकार सुरू असल्याचा आरोप जनतेकडून केला जात आहे. तूर्तास एवढेच उर्वरित पुढील भागात

CMYK

## आला उन्हाळा आरोग्य सांभाळा

राज्यात सूर्यनारायणाने आपला प्रकोप दाखवायला सुरुवात केली आहे. मार्च महिन्याच्या सुरुवातीपासूनच राज्यातील तापमान वाढायला सुरुवात झाली होती. सर्वत्र उकाडा जाणवत होता. आता मार्च महिन्याच्या अखेरीस तर राज्यातील अनेक शहरांचे तापमान उच्चांकी पातळीवर पोहचले आहे. राज्यातील अनेक शहरांचे तापमान ४० अंशाच्या घरात पोहचले आहे. काही शहरांनी तर ४० अंशाचा आकडा देखील पार केला आहे. विदर्भ मराठवाड्यात तर तापमानाने आजच उच्चांक गाठला आहे. पुढील दोन आठवड्यात राज्यातील सर्वच शहरांचे तापमान ४० अंश सेल्सिअसच्या घरात पोहचेल आणि राज्यात प्रचंड उकाडा जाणवेल असा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. पुढील दोन महिने राज्यातील तापमान उच्चांकी अंशावर पोहचेल आणि राज्यात यावर्षी प्रचंड उकाडा जाणवेल हा हवामान खात्याने वर्तवलेला अंदाज खरा ठरताना दिसत आहे. याशिवाय यावर्षी राज्यात उष्णतेच्या लाटा येतील असाही अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. हा अंदाज नागरिकांची झोप उडवणारा ठरत आहे कारण मार्च महिन्यातच सूर्यनारायणाने आपला प्रकोप दाखवायला सुरुवात केली असल्याने पुढील दोन महिने कसे निघेल याच चिंतेत नागरिक आहेत. पुढील दोन महिन्यात राज्यात उष्णतेच्या लाटा येणार असून तापमान प्रचंड वाढणार असल्याने हे दोन महिने जनतेसाठी जीकरीचे ठरणार असल्याने उन्हापासून बचाव करण्याची कसरत नागरिकांना करावी लागणार आहे. उन्हाळा सुरू झाला की नागरिकांना आरोग्याच्या तक्रारी जाणवू लागतात. उन्हाळ्याच्या झळा वाढल्या की थकवा येणे, चक्कर येणे, हातापायाला गोळे येणे, उष्माघात आणि मृत्यू असे परिणाम माणसांमध्ये दिसून येतात. काहींना डोळ्याचे तर काहींना त्वचेचे विकार जडतात. उन्हाळ्यात विविध प्रकारचे श्र्वसन विषयक, मेंदूचे आणि हृदयाचे आजार होतात. रक्तदाब आणि मधुमेहासारख्या व्याधी असलेल्या व्यक्तींनी उन्हाळ्यात विशेष खबरदारी घ्यावी. उन्हाळ्यात उष्माघात होण्याचे प्रमाण खूप वाढते. उष्माघातामुळे शरीराचे तापमान उच्च पातळीवर पोहचते. योग्य आणि वेळीच उपचार न मिळाल्यास संबंधित व्यक्ती दगावण्याची शक्यता असते. उष्माघातापासून बचाव करण्यासाठी नागरिकांनी घराबाहेर पडणे टाळावे. दुपारी बारा ते चार घराबाहेर पडूच नये, काही महत्वाचे काम असेल तरच घराबाहेर पडावे. घराबाहेर पडताना टोपी, गॉगल, बूट, चपलांचा वापर करावा. हलकी, पातळ, सच्छिद्र कपडे वापरावेत. उन्हात काम करणाऱ्या व्यक्तींनी टोपी, छत्री, गॉगल यांचा नियमित वापर करावा. तापमान वाढले की शरीरातील पाणी कमी होते त्यामुळे डीहायड्रेशन होते. डीहायड्रेशन झाले की शरीरातील पाणी झपाट्याने कमी होते आणि चक्कर येते. त्यामुळे शरीरातील पाण्याची पातळी कमी होऊ नये यासाठी सतत पाणी पीत राहावे. शरीरात दररोज किमान दोन लिटर पाणी जाणे गरजेचे असते. घराबाहेर पडताना पाण्याची बाटली सोबत न्यायला विसरू नका. साध्या पाण्यासोबत नारळपाणी, भाज्यांचे, फळांचे रस दररोज प्यायले तरी हरकत नाही. मार्च महिन्यातच उन्हाळ्याच्या झळा जाणवू लागल्याने पुढील दोन महिने उष्णतेची तीव्रता किती असेल याची कल्पना केली तरी या वर्षीची उन्हाची दाहकता लक्षात येईल. त्यामुळेच प्रत्येकाने उन्हाळ्यात आपले आरोग्य सांभाळणे गरजेचे आहे. खबरदारी घेऊनच आपण उन्हाच्या तीव्रतेपासून स्वतःचा बचाव करू शकतो.

# बर्ड फ्लू संसर्ग प्रतिबंधासाठी सर्व विभागांनी दिलेल्या सूचनांची प्रभावी अंमलबजावणी करावी - कुमार आशीर्वाद (जिल्हाधिकारी)

**दैनिक आपला विदर्भ**

**सोलापूर/प्रतिनिधी :** सोलापूर महापालिकेच्या हद्दीतील छत्रपती संभाजी नगर तलाव परिसर व किल्ला भाग परिसरात ७ मार्च रोजी कावळा व बगळा या पक्षांचा नैसर्गिक मृत्यू झाला होता. त्याचे नमुने तपासणीसाठी पाठविण्यात येऊन त्या प्राण्यांना बर्ड फ्लू असल्याचा अहवाल प्राप्त झालेला होता. त्या अनुषंगाने बर्ड फ्लू प्रतिबंध आणि नियंत्रणासाठी राष्ट्रीय कृती आराखडा २०२१ नुसार उपरोक्त दोन्हीही परिसर हे दक्षता झोन म्हणून जाहीर करण्यात आलेला आहे. तरी सर्व शासकीय विभागानी या क्षेत्रात व अन्य भागात बर्ड फ्ल्यू च संसर्ग होऊ नये यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले.

जिल्ह्यात बर्ड फ्ल्यू चा संसर्ग होऊ नये या अनुषंगाने करावयाच्या उपाय योजनेच्या दृष्टीने आयोजित आढावा बैठकीत जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद मार्गदर्शन करत होते. यावेळी पोलीस शहर उपायुक्त




दिपाली काळे, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉक्टर व्हि डि. येवले, जिल्हा परिषदेचे पशुसंवर्धन अधिकारी डॉ एन. एल. नरळे, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन डॉ. भास्कर पराडे, अन्न व औषध प्रशासनाचे सहाय्यक आयुक्त साहेबराव देसाई, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुहास माने, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे डॉ. संतोष भोई यांच्यासह सर्व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशीर्वाद पुढे म्हणाले की महानगरपालिका हद्दीतील छत्रपती संभाजी नगर तलाव परिसर व किल्ला भाग परिसर हे बाधित क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आलेले आहेत त्या अनुषंगाने अन्न व औषध प्रशासन विभाग व पोलीस विभागाने या परिसरातील सर्व चिकन शॉप बंद करावेत. महापालिकेने या परिसराचे निर्जंतुकीकरण करून घ्यावे. या परिसरात सर्वसामान्य नागरिकांच्या माहितीसाठी बॅनर्स लावावे तसेच महापालिकेने या ठिकाणी माहिती देण्यासाठी कर्मचारी नियुक्त करावेत. त्याचप्रमाणे पशुसंवर्धन विभागाने या भागातील घरगुती प्राणी पक्षी यांचे सर्वेक्षण पूर्ण करून घ्यावे व त्यातील आजारी प्राण्यांचे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेकडे पाठवावे, असेही त्यांनी निर्देशित केले.

मृत्यू पावलेल्या पक्षांचे डिस्पोजल महानगरपालिकेने करावे त्यासाठी जागा शोधून ठेवावी. वन विभागाने जंगली पक्ष मृत्यू पावल्यास त्याचे डिस्पोजल साठी महानगरपालिकेकडे पाठवावे. पक्ष्यांच्या डिस्पोजल साठी महानगरपालिकेने पथके तयार करावीत. प्रत्येक विभागाने कृती आराखड्याप्रमाणे त्यांच्यावर सोपवण्यात आलेली जबाबदारी अत्यंत प्रभावीपणे पार पाडून हा आजार इतरत्र फैलावणार नाही यासाठी दक्ष रहावे असे निर्देश जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिले. तसेच सोलापूर शहर व जिल्ह्यातील नागरिकांनी बर्ड फ्लू आजाराच्या अनुषंगाने घाबरण्याचे कोणतेही कारण नाही. हा आजार पक्षांमध्ये आढळून आलेला आहे, परंतु हा आजार इतरत्र फैलावणार नाही यासाठी सर्वांनी काळजी घेण्याचे आवाहनही यावेळी त्यांनी केले.

प्रारंभी पशुसंवर्धन उपायुक्त डॉक्टर येवले यांनी सोलापूर महापालिका हद्दीत छत्रपती संभाजी नगर तलाव व किल्ला बाग परिसरात कावळा बगळा इत्यादी पक्षी नैसर्गिक मृत्यू झाल्याचे आढळून आल्याने त्यांचे नमुने तपासणीसाठी पुणे येथील प्रयोगशाळेकडे पाठवण्यात आलेले होते त्यानुसार त्यांच्या अहवाल पॉझिटिव्ह आल्याने हा परिसर बाधित क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आलेला आहे. तसेच या ठिकाणी कृती आराखडा याप्रमाणे उपाययोजना करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

तसेच छत्रपती संभाजी नगर तलाव परिसर व किल्ला भाग परिसर एक किलोमीटर परिघातील ७४ नमुने तर झिरो ते दहा किलोमीटर परिघातील १२६ नमुने घरगुती पक्षी प्राण्याचे घेऊन पुणे येथील प्रयोगशाळेकडे तपासणीसाठी पाठवण्यात आल्याचे सांगून बर्ड फ्लू हा संसर्ग जंगली पक्षांमध्ये झालेला असून घरगुती पक्षांचे नमुने तपासणी अहवाल उद्या प्राप्त होणार असल्याची माहिती डॉ. येवले यांनी यावेळी दिली.

या आजाराच्या अनुषंगाने नागरिकांनी घाबरण्याचे कारण नाही परंतु बाधित क्षेत्रातील चिकन शॉप बंद करण्यात आलेले आहेत. या परिसरातून चिकन खरेदी करू नये. तसेच कोणत्याही ठिकाणाहून चिकन खरेदी केल्यानंतर ते १०० डिग्री तापमानावर व्यवस्थित शिजवून खावे. अंडी बॉईल करून खावेत. बाधित क्षेत्रात नागरिकांनी जाऊ नये, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे.

# New Begining म्हणत प्रसिद्ध खलनायिका रुपाली भोसलेनं शेअर केला VIDEO, होतंय कौतुक

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** 'आई कुठे काय करते' या मालिकेने काही महिन्यांपूर्वीच प्रेक्षकांचा निरोप घेतला असला तरी, मालिकेतील कलाकार आजही चर्चेत आहेत. याच मालिकेतील एक प्रसिद्ध अभिनेत्री मालिका संपताच उकडीचे मोदक करायला बसली आहे. अभिनेत्रीने तब्बल१०० मोदक स्वत:च्या हाताने तयार केले. अभिनेत्रीला मोदक करताना पाहून चाहत्यांनी तिचं कौतुक केलं आहे.

आपण ज्या अभिनेत्रीबद्दल बोलतोय ती अभिनेत्री म्हणजेच रुपाली भोसले. आई कुठे काय करते मालिकेत रुपालीने संजनाची भूमिका साकारून प्रेक्षकांची मनं जिंकली. मालिका संपल्यानंतर तिने आईच्या व्यवसायात लक्ष देण्याचं ठरवलं आहे.

रुपाली भोसले उत्तम स्वयंपाक बनवते.'बिग बॉस मराठी'मध्ये असताना देखील तिच्या पाककौशल्याची झलक सर्वांना पाहायला मिळाली होती. नुकताच तिने उकडीचे मोदक बनवतानाचा व्हिडीओ इन्स्टाग्रामवर शेअर केला आहे. हे मोदक तिने आईच्या नव्या व्यवसायासाठी मदतीच्या हेतूने बनवले आहेत.

रुपालीच्या आईने घरगुती जेवणाच्या ऑर्डरचा व्यवसाय सुरू केला आहे. भविष्यात क्लाउड किचन किंवा रेस्टॉरंट सुरू करण्याचे त्यांचे स्वप्न आहे. नुकतीच त्यांच्या कुटुंबाला १०० उकडीच्या मोदकांची ऑर्डर मिळाली होती. हे मोदक बनवतानाचा व्हिडीओ रुपालीने तिच्या चाहत्यांसोबत शेअर केला आहे.

आम्ही सुरू केलं आणि करून दाखवलं - रुपाली भोसले

रुपालीने व्हिडीओ शेअर करत, गणपती बाप्पा मोरया आम्ही सुरू केलं आणि करून दाखवलं १०० उकडीच्या मोदकांची ऑर्डर पूर्ण केली. असे कॅप्शन दिले आहे. तसेच, नवीन सुरुवात, क्लाउड किचन असे हॅशटॅगही वापरले आहेत. चाहत्यांसह अनेक नेटकऱ्यांनी या व्हिडीओवर कौतुकाचा वर्षाव केला आहे.

# देशी गाई संगोपनातील महाराष्ट्र शासनाची वाटचाल

– डॉ. राजकुमार पडिले

महाराष्ट्र कृषिप्रधान राज्य आहे आणि येथे विविध प्रकारच्या देशी गाईंच्या जाती आढळतात. यामध्ये मराठवाड्यातील नांदेड जिल्ह्यातील लाल कंधारी, लातूर जिल्ह्यातील देवणी, पश्चिम महाराष्ट्रात खिल्लार, उत्तर महाराष्ट्रात डांगी, तर विदर्भात गवळाऊ जातींचा समावेश आहे. देशी गाईचे दूध हे मानवी आहारातील अत्यंत पोषणमूल्य असलेला पदार्थ आहे, ज्याचा उपयोग आयुर्वेदिक चिकित्सा पद्धती आणि सेंद्रिय शेतीत मोठ्या प्रमाणावर केला जातो.

देशी गाईंच्या दुधाचे मानवी आहारात स्थान असतेच, परंतु त्याचबरोबर देशी गाईंचे गोमूत्र व शेण यांचा सेंद्रिय शेतीसाठी महत्त्वपूर्ण उपयोग होतो. त्यामुळे, देशी गाईंच्या संख्येत होणारी घट ही चिंतेची बाब बनली आहे. महाराष्ट्रात देखील यामध्ये घट होत असताना, महाराष्ट्र शासनाने देशी गाईंचे संरक्षण आणि त्यांच्या संगोपनासाठी महत्त्वाची पावले उचलली आहेत. चला, जाणून घेऊया महाराष्ट्र शासनाच्या विविध उपाययोजनांबद्दलष

संपूर्ण गोवंश हत्या बंदी कायदा

महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९७६ मध्ये सुधारणा करून महाराष्ट्र प्राणी रक्षण सुधारणा अधिनियम १९९५ आणला गेला. या कायद्यानुसार २०१५ पासून महाराष्ट्र राज्यात गोवंशांची (गाय, बैल, वळू, वासरे) हत्या पूर्णपणे बंदी केली आहे. या कायद्याअंतर्गत राज्यात कुणालाही गोवंशांची कत्तल करणे, कत्तलीसाठी वाहतूक करणे, किंवा कत्तल केलेले मांस विक्रीसाठी आणणे किंवा ताब्यात ठेवणे हे कायद्याने निषिद्ध आहे. या कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांना पाच वर्षापर्यंत कारावासाची शिक्षा किंवा १०,००० रुपये दंड, किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात. या कायद्यामुळे देशी गाईंच्या संरक्षणाला मोठा हातभार लागला आहे.




देशी गाईस राजमाता गोमाता घोषित करणे

भारतीय संस्कृतीत देशी गाईला नेहमीच विशेष महत्त्व दिले गेले आहे. आयुर्वेदात पंचगव्याचा वापर आणि सेंद्रिय शेतीत गोमूत्र व शेण यांचे महत्त्व लक्षात घेत, महाराष्ट्र शासनाने ३० सप्टेंबर २०२४ रोजी देशी गाईला राज्य माता 'गोमाता' म्हणून घोषित केले आहे. यामुळे देशी गाईंच्या संगोपनास अधिक अधिकार आणि संरक्षण मिळाले आहे.

गोसेवा आयोगाची स्थापना

महाराष्ट्रात प्राणी संरक्षण व संवर्धनासाठी अनेक संस्था कार्यरत आहेत. त्यांचे कार्यक्षेत्र विस्तारण्यासाठी आणि त्यांचे कार्यप्रदर्शन सुधारण्यासाठी महाराष्ट्र गोसेवा आयोग २०२३ मध्ये स्थापित करण्यात आला. या माध्यमातून पशु संरक्षण, गोवंश संरक्षण, अनुवंशिक सुधारणा, आणि वैरण विकासासाठी काम केले जात आहे. आयोगाच्या अध्यक्षपदी डॉ. चंद्रशेखर मुंदडा आणि सदस्य सचिव म्हणून डॉ. मंजुषा जोशी कार्यरत आहेत. यामुळे गोवंशाच्या संवर्धनाला एक मजबूत आधार मिळाला.

सुधारित गोवर्धन गोवंश सेवा केंद्राची स्थापना

देशी गाईंच्या संरक्षणासाठी महाराष्ट्र शासनाने सुधारित 'गोवर्धन गोवंश सेवा केंद्र' स्थापन केले आहेत. या केंद्रांत गोवंशांची देखभाल, गोमूत्र व शेणापासून विविध उत्पादने तयार करण्यासाठी विशेष सुविधा दिल्या जातात. या केंद्रात गोवंशांच्या देखभालीसाठी गोशाळा व गोवंश असलेल्या संस्थांना अनुदान देण्यात येते, जेणेकरून त्यांना चारापाणी, निवाऱ्याची सोय केली जाऊ शकेल. प्रत्येक तालुक्यात एक 'गोवर्धन गोवंश सेवा केंद्र' स्थापन करण्याचे उद्दिष्ट आहे.

देशी गाईंसाठी परिपोषण आहार

महाराष्ट्र शासनाने २०२४ पासून गोशाळांमध्ये संगोपन करणाऱ्या देशी गाईंसाठी ५० रुपये प्रति गोवंश अनुदान देण्याची योजना सुरू केली आहे. यासाठी गोशाळांना पंरपरागत गोवंशाची देखभाल आणि संगोपन करणे, व त्यांना योग्य आहार देणे आवश्यक आहे. गोशाळेचे नोंदणी करणाऱ्या संस्थाचं या अनुदानासाठी पात्र आहे.

मनरेगामधून गोठा बांधणी

महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेअंतर्गत गोठा बांधणीसाठी अनुदान दिले जाते. महाराष्ट्रात शेतकऱ्यांना त्यांच्या गोवंशाच्या संख्येनुसार ७७ हजार ते २ लाख ३१ हजार रुपयांपर्यंत गोठा बांधणीसाठी अनुदान मिळते. यामुळे शेतकऱ्यांना आपल्या पशुधनाची देखभाल करण्यासाठी आवश्यक गोठे बांधता येतात, आणि त्यांची आर्थिक स्थिती मजबूत होऊ शकते.

चारा लागवडीसाठी शंभर टक्के अनुदान

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत चारा लागवडीसाठी शंभर टक्के अनुदान दिले जाते. हे अनुदान विशेषत: वन जमिनीजवळील गायरानसाठी दिले जाते, ज्यामुळे शेतकऱ्यांना गोवंशांसाठी योग्य चारा लागवड करता येतो.

देशी गाईंचे संवर्धन हे केवळ आर्थिक दृष्ट्या महत्त्वाचे नाही, तर ते पर्यावरणीय दृष्ट्या देखील आवश्यक आहे. देशी गाईंच्या दुधाचे पोषणमूल्य, गोमूत्र व शेणाचे सेंद्रिय शेतीमध्ये योगदान, आणि शेतकऱ्यांना आर्थिक समृद्धी मिळवून देणारे फायदे लक्षात घेता, महाराष्ट्र शासनाने उचललेले पाऊले अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत. यामुळे देशी गाईंचे संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी सरकारच्या विविध योजनांचा अधिकाधिक लाभ घेणे आवश्यक आहे.

आपण सर्वांनी एकत्र येऊन देशी गाईंच्या संगोपनात सहभागी झाल्यास महाराष्ट्रातील गाईंचे संरक्षण सुनिश्चित होईल, आणि शेतकऱ्यांना एक समृद्ध आणि सशक्त भविष्य मिळेल.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# औरंगजेबाची ढाल करून काही लोक दंगल उसळत आहेत : खा. संजय राऊत यांचा पत्रकार परिषदेत आरोप

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** नागपूर येथील दंगल आम्ही पाहण्यापेक्षा मुख्यमंत्र्यांनी पाहिली असती तर, दंगलखोर कुठल्या जातीच्या, कुठल्या पक्षाचा, कोणत्या गटाचा हे न पाहता महाराष्ट्रासारखा राज्यातली कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी ते कठोर पावले उचलतील. हे दंगल पेटवणारे कोण आहेत आणि दंगली का पेटवली जात आहे.गुढीपाडव्याला देखील दंगली उसळण्याचा प्रयत्न आपलीच लोक करतील. औरंगजेबाची ढाल करून काही लोक महाराष्ट्रात दंगल उसळत आहेत. असा आरोप खासदार संजय राऊत यांनी मुंबई येथे पत्रकार परिषदेत बोलताना केला. यावेळी ते म्हणाले की, सरकार तुमचे आहे तर, दंगली कशाला भडकवत आहात. मोहन भागवत, देवेंद्र फडणवीस, अजित पवार, एकनाथ शिंदे यांनी कुदळ फावडा घेऊन जावे आणि लोकांच्या इच्छा या पूर्ण कराव्यात. छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्याचे ते मेमोरियल आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भाजपची विचारधारा आहे. छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांचे महत्त्व कमी करायचे काम केले जात आहे. महाराष्ट्राच्या जनतेने या कारस्थानापासून सावध राहिले पाहिजे, असे आवाहन राऊत यांनी यावेळी केले.



तसेच ते म्हणाले की, बाबरीचे आंदोलन हे वेगळे होते. बाळासाहेबांची भूमिका तुम्ही आम्हाला सांगू नये, बाळासाहेबांचा हिंदुत्वाचा लढा हा राम मंदिरासाठी होता. मुख्यमंत्र्यांच्या मतदारसंघात बाहेरून येऊन दंगली पेटवत आहेत. तर, हे गृहमंत्र्यांचा फेल्युअर आहे. ही लोकं कोण आहेत दंगे पसरवत आहेत. ही विश्र्व हिंदू परिषदेची लोक आहेत किंवा संघाची लोक आहेत. त्यांचे चेहरे कळत आहेत. फडणवीसांना ती लोक माहीत असतील. हिंदूंना भडकविण्यासाठी हिंदूंवर हल्ले केले जात आहेत. हा नवीन पॅटर्न आता सुरू आहे. महाराष्ट्रात हा नवीन दंगल पॅटर्न तयार झालेला आहे.अशा दंगली पेटून २०२९ च्या निवडणुकींना सामोरे जायचे असा हा दंगल पॅटर्न आहे. औरंगजेबाच्या कबरीचे उदत्तीकरण हे महाराष्ट्रात कोणीही करू नये, तुमचीच माणसे हे करत आहेत. इतिहास मान्य केल्यावर तुमची माणसे जर कुदळ फावडी घेऊन तिकडे गेली असती तर त्यांच्यावर गुन्हे दाखल करा हे संघटित गुन्हेगार आहेत. सरकार बदनाम होत आहे. त्यामुळे अधिवेशनात अनेक प्रश्र्न दाबण्यासाठी हे औरंगजेबाचे प्रकरण बाहेर काढले आहे. जयकुमार रावल यांनी को-ऑपरेटिव्ह बँकेमध्ये आपल्या नातेवाईकांना पैसे दिले. गुजरातमधील नातेवाईकांना महाराष्ट्रातील को-ऑपरेटिव्ह बँकेतील पैसे देण्यात आले. हा मनी लॉन्ड्री चा प्रकार आहे. हा एसआयटीच्या अहवालातील आरोपी क्रमांक तीन जयकुमार रावल आहेत. देवेंद्र फडणवीस यांच्या सहीने ती एसआयटी दाबण्यात आली. सहकारी बँकेत असे घोटाळे होतात. तेव्हा मुलुंड मधील नागडा पोपटलाल हा रस्त्यावर येतो. मग जनतेचे १८० कोटी लुटणारे जयकुमार रावल हे मंत्रिमंडळात का? हा प्रश्र्न त्या मुलुंडच्या नागड्या पोपटलाला किंवा देवेंद्र फडणवीस यांना का पडू नये, फडणवीस यांनी या मंत्र्याचा राजीनामा घेतला पाहिजे. परंतु,असे विषय दाबण्यासाठी औरंगजेबाच्या कबरीचे प्रकरण उकरून दंगली भडकवली जात आहेत. असा आरोप यावेळी खासदार संजय राऊत यांनी केला.

## संक्षिप्त...

### प्रशांत कोटकरचा अटकपूर्व जामीन नाकारला



दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** इतिहास अभ्यासक इंद्रजित सावंत धमकी प्रकरणी कोल्हापुरात सुनावणी पार पडली असून प्रशांत कोरटकरचा अटकपूर्व जामीन अर्ज न्यायालयाने नाकारला आहे. इतिहास अभ्यासक इंद्रजित सावंत यांना धमकी प्रकरणी कोल्हापूर न्यायालयात सुनावणी पार पडली. यावेळी न्यायालयाने प्रशांत कोरटकरचा अटकपूर्व जामीन अर्ज नाकारला आहे. कोल्हापुरच्या सत्र न्यायालयाकडून जामीन अर्ज नामंजूर करण्यात आला आहे. प्रशांत कोरटकरला कधीही अटक होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.अशी माहिती सरकारी वकील विवेक शुक्ल यांनी दिली.

### औरंगजेबाची कबर काढून टाकण्याच्या मागणीला समर्थन रामगिरी महाराज यांची प्रतिक्रिया

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** औरंगजेबाची कबर काढून टाकण्याच्या मागणीला आमचे समर्थन आहे.



अशी प्रतिक्रिया महंत रामगिरी महाराज यांनी व्यक्त माध्यमांशी बोलताना व्यक्त केली. यावेळी पुढे बोलताना महंत रामगिरी महाराज म्हणाले की,औरंगजेब हा क्रूर प्रशासक होता. औरंगजेबाने मंदिरे पाडून मशिदी बांधल्या आहेत. यासोबतच त्याने कुंभमेळ्यावर देखील हल्ला केला होता.छत्रपती संभाजी महाराजांना धर्मपरिवर्तनासाठी त्याने मारले. अशा क्रूर औरंगजेबाची कबर काढण्याची जी मागणी सुरू आहे. त्याला आमचे समर्थन आहे. नागपुरात दंगल करणारे हे औरंगजेबाच्या विचारांचे आहेत. ही दंगल पूर्वनियोजित असून, तेथे दगड जमा करून दगडफेक करण्यात आली आहे. सध्या अराजकता पसरवली जात आहे. याच कारण मुस्लिम धर्मातील काही धर्म गुरू हे लहानपणापासून मुलांना शिक्षण देत आहेत. भारत हा हिंदू धर्माचा देश आहे. या देशात हिंदू आहेत म्हणून तुम्ही सुरक्षित आहात.असे मत महंत रामगिरी महाराज यांनी माधयमांशी बोलताना व्यक्त केले.

### महाराष्ट्रात औरंगजेबाच्या नावाने दंगल ही गंभीर बाब

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्रात औरंगजेबाच्या नावाने दंगल घडत असेल तर, ही गंभीर बाब आहे.असे मत आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केली.



यावेळी बोलताना ते म्हणाले की, नागपूर घडलेली घटना ही दुर्दैवी आहे. हा महाराष्ट्राच्या भूमीत छत्रपती शिवाजी महाराजांच्या पावन स्पर्शानी ज्या भूमिचा कण आणि कण पवित्र झाला. तिथे औरंगजेबाच्या नावाने दंगल घडत असेल तर, ही गंभीर बाब आहे. सरकार यात गंभीरतेने लक्ष देईल. याची सखोल चौकशी होत आहे. यात पाकिस्तानचा काही हात आहे का याची देखील चौकशी होत आहे. पोलीस के भी हात लंबे होतेय है असे म्हणत आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी सदर प्रकरणाचा पोलीस छडा लावून दोषींवर कारवाई करतील, असे सांगितले.

### नागपूर येथील घटनेनंतर जालना पोलीस ॲक्शन मोडवर

दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी :** नागपूर मध्ये घडलेल्या हिंसाचाराच्या घटनेनंतर जालना पोलीस क्शन मोडवर आली आहे.



शहरातील संवेदनशील ठिकाणी पोलिसांकडून पेट्रोलिंग केली जात असून, सोशल मीडियावरही पोलिस लक्ष ठेवून आहेत. अशी माहिती जालन्याचे अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नोपानी यांनी माध्यमांशी बोलताना माहिती दिली आहे. जालन्यातील नागरिकांनी कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवून जातीय सलोखा कायम ठेवावा असे आवाहन ही जालन्याचे अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नोपानी यांनी केले आहे. जालन्यात सार्वजनिक शांतता कायम राहावी यासाठी पोलीस सज्ज असल्याचे आयुष नोपानी म्हणालेत.

## लोकलमधील गर्दी कमी होणार, स्वत: रेल्वेमंत्र्यांनीच दिले संकेत

**मुंबई/प्रतिनिधी :** लोकल ही मुंबईकरांची लाइफलाइन आहे. दररोज लाखो लोक लोकलमधून प्रवास करतात. पश्चिम, मध्य आणि हार्बर असे तीन प्रमुख मार्गावरुन लोकलची वाहतूक होते. वसई-विरार, कल्याण-डोंबिवली तर पनवेलवरुनही नागरिक मुंबईत येतात. त्यामुळं लोकलमध्ये नेहमीच गर्दी असते. लोकलची गर्दी कमी करण्यासाठी प्रशासनाकडून विविध प्रकल्प हाती घेण्यात येत आहेत. त्यातच आता एक महत्त्वाची घोषणा केंद्रीय रेल्वेमंत्र्यांनी केली आहे.

मुंबईसाठी लवकरच २३८ नवीन लोकल धावणार आहेत, अशी माहिती केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी ही माहिती दिली आहे. गेल्या कित्येक वर्षापासून लोकलच्या फेऱ्या वाढवण्यात यावा, अशी मागणी करण्यात येत आहे. लोकलच्या फेऱ्या वाढवल्यानंतर गर्दी कमी होण्याची शक्यता आहे. प्रवाशांच्या या मागणीवर रेल्वेकडून गांभीर्याने विचार सुरू होता. आता केंद्रीय मंत्र्यांनी देखील याबाबत विचार करत मुंबईसाठी उच्च दर्जाच्या २३८ गाड्या तयार करण्यात येत असल्याचे म्हटलं आहे. राज्यसभेत बोलताना त्यांनी ही माहिती दिली आहे.

## राजकीय स्वार्थासाठी धर्मांध शक्तींकडून महाराष्ट्रात दंगली प्रयत्न केला जातोय - अजित नवले



दैनिक आपला विदर्भ

**अहिल्यानगर/प्रतिनिधी :** जनतेचे रोजीरोटीचे प्रश्र्न सोडविण्यात आलेले अपयश झाकण्यासाठी व आपला धर्मांध अजेंडा पुढे रेटण्यासाठी राज्यात धर्मांध शक्तींकडून सुनियोजित कट करण्यात आला आहे. इतिहासाचा सर्रास गैरवापर करत रोज धार्मिक तेढ वाढविणारी केली जाणारी विधाने व नुकत्याच पेटविल्या गेलेल्या नागपूरच्या दंगली या कारस्थानांचा भाग आहेत असे शेतकरी नेते अजित नवलेंनी सांगितलं आहे.

महाराष्ट्राच्या जनतेने या कठीण काळात आपला संयम व विवेक शाबूत ठेवत शांतता बाळगावी व धर्मांध कारस्थानांपासून दूर राहावे असे आवाहन मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष करत आहे. राज्याचे मंत्री रोज धार्मिक तेढ वाढविणारी विधाने करत आहेत. मुख्यमंत्र्यांचा आपल्याला पाठिंबा असल्याने आपले कुणीही काहीही करू शकत नाही असे सांगत आहेत. राज्यात आपलीच सत्ता असल्याने आपण कसेही वागलो तरी घाबरण्याचे कारण नाही असे सांगत धर्मांध संघटनांना ते चेतवित आहेत. धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्या अशा व्यक्ती व संघटनांवर कडक कारवाई करावी अशी मागणी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष करत आहे. असंही नवलेंनी सांगितले.

## ठाणे ग्रामीण भागातील लोकांच्या कल्याणासाठी अर्थसंकल्प – मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे



दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी :** ठाणे जिल्हा परिषदेचा २०२५-२६ या वर्षाचा अर्थसंकल्प आज मंगळवार, दि. १८ मार्च, २०२५ रोजी सकाळी ११ वाजता, बी. जे. हायस्कूल येथील सभागृहात सादर करण्यात आला. जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी वैजनाथ बुरडकर यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्याकडे अर्थसंकल्प सादर करण्यासाठी अर्थसंकल्पाची प्रत यावेळी प्रदान केली. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक रोहन घुगे यांनी जिल्हा परिषदेचा १०८. ९३ कोटी रुपयाचा अर्थसंकल्प सादर करताना लोकाभिमुख, गतिमान, पारदर्शक अर्थसंकल्प आहे असे प्रतिपादन केले. जिल्हा परिषदेचा अर्थसंकल्प लोकाभिमुख असल्याचे सांगताना मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणाले की, समाज कल्याण विभाग अंतर्गत दिव्यांग व्यक्तींचे सर्वेक्षण करून जिल्ह्यातील दिव्यांग व्यक्तींची माहिती, कुटुंब प्रमुख, आर्थिक स्थिती तसेच आवश्यकता लक्षात घेऊन २६ योजना तयार करण्यात आला आहेत. तसेच ग्रामपंचायत विभाग अंतर्गत घरपोच सोईसुविधा पोहोचवण्यासाठी आपले सरकार सेवा केंद्र तसेच ऑनलाईन शासकीय दाखले देण्यासाठी अपमार्फत कामकाज करण्यात येणार आहे. कृषी विभाग व पशूसंवर्धन विभाग अंतर्गत शेतकरी व पशुपालकांचे उत्पन्न वाढीसाठी प्रत्यक्षरीत्या काम करण्यात येणार आहे. शासकीय कामकाजातील अडथळा कमी करण्यासाठी तसेच नियोजनबद्ध काम करण्यासाठी सामान्य प्रशासन विभागांतर्गत वेब पोर्टल तयार करण्यात येणार असून, प्रत्येक कर्मचारी व अधिकाऱ्यांची ऑनलाईन माहिती पोर्टलवर उपलब्ध असेल. जेणेकरून मेडिकल बिल, पेन्शन, सेवार्थ लाभ देण्यासाठी सुलभ असेल. रोगनिदान चाचण्या ई संजीवनी कार्यक्रम दिव्यांगाना सार्वजनिक इमारती सुगम्य करणे इत्यादी लोकाभिमुख कार्यक्रम राबविताना वैद्यकीय प्रतिकृती देयक, भविष्य निर्वाह निधी, मालमत्ता नोंदणी, कामवाटप इत्यादींची संगणकीय प्रणाली निर्माण करून पारदर्शक व गतिमान कार्य करण्याचे यावेळी आश्वासित केले आहे.

## पर्यटकांसाठी माथेरान बंद; नेमकं कारण काय?

**रायगड/प्रतिनिधी :** तुम्हीही माथेरानला फिरायला जात आहात तर ही बातमी तुमच्यासाठी. माथेरानमध्ये फिरण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांच्या फसवणुकीच्या तसेच लुटीचे प्रकार समोर येत आहेत. त्यामुळे माथेरानची बदनामी होत आहे. याच पार्श्र्वभूमीवर आजपासून (दि १८) माथेरानमध्ये बेमुदत बंद केला गेला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दस्तुरी नाक्यावरील येणाऱ्या पर्यटकांची दिशाभूल करून आर्थिक फसवणूक केली जाते. याचा येथील सर्वसामान्य कष्टकरी पासून ते हॉटेल इंडस्ट्री या सर्वांच्या व्यवसायावर विपरीत परिणाम झालेला आहे. ही फसवणूकीची पध्दत लवकरच बंद करण्यात आली नाही, तर १८ मार्च पासून बेमुदत माथेरान बंद करण्यात येणार असा इशारा समितीने सर्वच अधिकारी वर्गाला दिला होता, त्यासाठी अधीक्षक कार्यालयात समितीच्या सदस्यांच्या बैठकीचे आयोजन सोमवारी १७ मार्च रोजी करण्यात आले होते.

## शिरपूर ग्रामपंचायत सरपंचपदी सिंधुताई कांबळे यांची बिनविरोध निवड

दैनिक आपला विदर्भ

**शिरपूर/प्रतिनिधी :** १८ ग्रामपंचायतीच्या सरपंच पदासाठी झालेल्या निवड प्रक्रियेत सिंधुताई कांबळे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. गावाच्या विकासासाठी कटिबद्धतेने काम करणाऱ्या सिंधुताई कांबळे यांच्या निवडीने ग्रामस्थांत समाधानाचे वातावरण आहे.





अमरावती विभागीय आयुक्तांनी तत्कालीन सरपंच राजकन्या संतोष आढागळे यांना कर्तव्यात कसूर आणि दिरंगाई केल्याच्या कारणावरून महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ मधील कलम ३९ (१) अंतर्गतपदावरून अपात्र घोषित केले होते. त्यामुळे शिरपूर ग्रामपंचायतीचे सरपंचपद रिक्त झाले होते. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ मधील कलम ३३ (२) आणि ग्रामपंचायत सरपंच निवडणूक नियम १९६४ नुसार ही निवडणूक ग्रामपंचायत सदस्यांमधून घेतली गेली आहे.

शिरपूर ग्रामपंचायतीच्या १७ सदस्यांपैकी फक्त दोन महिला सदस्य अनुसूचित जातीच्या प्रवर्गातून निवडून आल्या होत्या. त्यापैकी एक अपात्र ठरल्याने, उर्वरित सदस्य सिंधू विलास कांबळे यांचा सरपंचपदाचा मार्ग मोकळा झाला आहे. ही निवडणूक नायब तहसीलदार रंजना गोरे, मंडळ अधिकारी आर. जी. देशपांडे, जयंत साठे आणि गणेश गवळी यांच्या देखरेख निगराणीत पार पडली आहे.

# डोणगाव मंडळातील रस्त्याने घेतला मोकळा श्वास

## शेत रस्ते मोकळे करण्याच्या मोहिमेअंतर्गत अनेक क्षेत्र रस्त्यांची केले खुले

दैनिक आपला विदर्भ





**डोणगाव/प्रतिनिधी :** रस्ते हे विकासाचे पहिले पाऊल आहे. त्यामुळे गावात, शेतात जाण्यासाठी सुसज्ज रस्ते असणे आवश्यक आहे. मात्र, असे असताना संपूर्ण देशाचे सर्वात मोठा व्यवसाय असलेल्या कृषी क्षेत्रातील रस्ते मात्र, अत्यंत नादुरुस्त आहेत.तर, काही रस्ते हे अतिक्रमणाने वेढलेल आहेत. परिणामी, शेतकऱ्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. शेतकऱ्यांची समस्या लक्षात घेता शासनाने रस्ते मोकळे करण्याच्या मोहीम आखली असून या मोहिमेअंतर्गत दोन गाव परिसरातील मंडळातील अनेक पांदण रस्ते मोकळे करण्यात आल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. डोणगाव मंडळातील शेत रस्ते अतिक्रमाने वेढलेले असल्याने शेतकऱ्यांना शेतात येजा करण्यास मोठा त्रास सहन करावा लागत होते. त्याचबरोबर शेतातील माल आणताना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत होती. शेती ही आधुनिक पद्धतीने केली जात असल्याने शेतात यंत्राचा वापर वाढला आहे. त्यामुळे शेतात यंत्र निऑन करतानाही मोठा त्रास सहन करावा लागत आहे. रस्ते अभावी अनेक वेळा शेतकऱ्यांमध्ये अंतर्गत वादही निर्माण होत होते. परिणामी विकासाला चालना मिळण्याऐवजी शेतकऱ्यांचा विकासाला चालना मिळाण्याऐवजी विकासाला ब्रेक लागत होता. शेत रस्ते मोकळे करावे अशी मागणी अनेक शेतकऱ्यांनी तहसीलदार यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली होती. तर शासनाने ही १०० दिवसाच्या कृती आराखड्यात रस्ते मोकळे करण्याच्या मोहिम आखली आहे.या मोहीमतंर्गत डोणगाव मंडळातील डोणगाव शिवारातील गट नंबर ३८१ ते ३६७ पर्यंत शेत रस्ता सरपंच पोलीस पाटील, माजी सरपंच, अर्जदार, गैर अर्जदार, मंडळ अधिकारी चनखोरे, ग्राम महसूल अधिकारी अमोल राठोड, अनुप नारोटे, सीमा चव्हाण, महसूल सहायक संदीप परमाळे यांच्या समक्ष आरेगाव ते लेहणी शिव रस्ता मोकळा करण्यात आला. यावेळी मंडळ अधिकारी चनखोरे, तलाठी भूषण खिल्लारे, अमोल राठोड महसूल सहायक संदीप प्रमाणे, पुंडलिक राक्षे, पंच, अर्जदार, गैरअर्जदार यांची उपस्थिती होती.

### आता खडीकरण डांबरीकरण करणार भर द्यावा

ग्रामीण भागातील शेती हा मुख्य व्यवसाय असल्याने या व्यवसायाला चालना देण्यासाठी त्याच बरोबर वर्षानुवर्षांपासून रस्त्यामुळे खस्ता खात असलेल्या शेतकऱ्यांना शेती विकासासाठी शासनाने शेत रस्ते मोकळे करण्याचे काम हाती घेतली आहे. यामुळे शेतकऱ्यांमध्ये आनंद व्यक्त केला जात आहे. शेत रस्ते मोकळे करण्याबरोबरच मायबाप शासनाने शेत रस्त्याचे खडीकरण डांबरीकरण करून देण्यासाठी पुढाकार घ्यावा, ग्रामीण विकासाला चालना देण्यासाठी शेत रस्त्याच्या शेतात जाण्यासाठी पक्के रस्ते करून द्यावे, अशी अपेक्षा जगाचा पोशिंदा म्हणून उपाधी मिळाले मिळालेल्या शेतकरी वर्गाकडून केली जात आहे.

## विविध वृत्त...

### रस्ता लूट करणाऱ्यांना पोलिसांनी अवघ्या २४ तासात केले जेरबंद



दैनिक आपला विदर्भ

**धुळे/प्रतिनिधी :** रस्ता लूट करणाऱ्या आरोपींना धुळे तालुका पोलिसांनी अवघ्या २४ तासात जेरबंद केले. त्यांच्याकडून १५ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला आहे.

दि.१६ मार्च रोजी अभिजान खान व्यवसाय-मिक्सर मशिन विक्री ही त्यांच्या मोटार सायकलवर मिक्सर मशिन विक्रीसाठी गेलेले असतांना वेल्हाने ते मोरशेवडी रस्त्यावरील बंद पडलेल्या एका कारखान्या जवळ दोन अनोळखी लोकांनी त्यांची मोटार सायकल अडवून तक्रारदाराच्या जवळील १६०० रुपयांचे मिक्सर मशिन जाणि १३ हजार ६०० रुपये असे एकुण १५ हजार २०० रुपयाचे माल तक्रारदारास मारहाण करून जिवे ठार मारण्याची धमकी देवून जबरीने चोरून नेला.

या घटनेबाबत तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होताच पोलिसांनी आपली तपासाची चक्र फिरवत अवघ्या २४ तासात धुळे तालुक्यातील मोरशेवडी गावात राहणाऱ्या ज्ञानेश्र्वर ईश्र्वर भील यास ताब्यात घेवून विचारपूस केली असता त्याने सदर गुन्ह्याची कबुली दिली. दरम्यान त्याच्याकडील १४ हजार २०० रुपये पोलिसांनी त्याच्याकडून हस्तगत केले असल्याची माहिती पोलीस निरीक्षक शशिकांत पाटील यांनी यावेळी दिली.

### शासकीय आयटीआय सिंदखेड राजा येथे निरुपयोगी साहित्यांचा लिलाव

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** राजे लखुजीराव जाधव शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, सिंदखेडराजा येथील वापरून निकामी, निरुपयोगी, कालबाह्य यंत्रसामग्री, हत्यारे व अवजारे इत्यादी निर्लेखित करण्यात आलेल्या साहित्याच्या विक्रीसाठी सिलबंद निविदा मागविण्यात आल्या आहेत. साहित्याची यादी आणि पाहणीची व्यवस्था संस्था कार्यालयात दि. १७ मार्चपासून कार्यालयीन वेळेत करण्यात आली आहे. मोहोरबंद निविदा दिनांक २६ मार्च २०२५ रोजी बुधवार सायंकाळी ०४:०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत निविदा पेटीत जमा कराव्यात. नंतर आलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. निविदेच्या अटी व शर्ती कार्यालयात उपलब्ध आहेत. निविदा अर्जाची किंमत १०० रुपये रोख भरून निश्र्चित कालावधीत अर्ज प्राप्त करुन घ्यावे. साहित्याची संख्या कमी-अधिक करण्याचे अथवा निविदा नाकारण्याचे पूर्ण अधिकार प्राचार्य, राजे लखुजीराव जाधव शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, सिंदखेडराजा यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहेत. या निविदा प्रक्रियेत इच्छूकांनी सहभागी होण्याचे आवाहन संस्थेचे प्राचार्य जि.एस. भावले यांनी केले आहे.

### अवैधरित्या होणारी मद्याची वाहतूक स्थानिक गुन्हे शाखेने रोखली, ६ लाख ३३ हजार ३२५ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत



दैनिक आपला विदर्भ

**धुळे/प्रतिनिधी :** धुळे जिल्हा स्थानिक गुन्हा अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक श्रीराम पवार यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार एका चार चाकी वाहनातून बेकायदेशीर रित्या विदेशी दारू आणि बियर ची मालेगाव कडून नवापूरच्या दिशेने अवैध्यरित्या वाहतूक होत असल्याची माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हा अन्वेषण शाखेच्या पथकाने मालेगाव धुळे महामार्गावर सापळा रचून संशयित वाहनाचा सिनेस्टाईल पाठलाग करून त्याला ताब्यात घेतले व त्यांनी तपासणी केली असता त्यामध्ये लाखो रुपयांचा विदेशी दारू आणि बियरचा साठा मिळून आला.

पोलिसांनी वाहनासह जप्त केलेल्या मुद्देमालाची किंमत तब्बल ६ लाख ते ३३ हजार ३२५ रुपये इतकी असून याप्रकरणी दोन जणांना ताब्यात घेण्यात आले असून आम्हाला त्यांनी कुठून आणला होता व तो कुठे नेत होते याचा अधिक तपास पोलीस करीत आहे.

# सरकारकडून आंदोलन चिरडण्याचा प्रयत्न; शेतकरी नेते रविकांत तुपकर यांचा आरोप

दैनिक आपला विदर्भ



**बुलढाणा/प्रतिनिधी :** संविधानाने आम्हाला आंदोलन आणि सत्याग्रह करायचा अधिकार दिला आहे. इंग्रजांना सुद्धा लाजवेल असे, महाराष्ट्र पोलीस आणि बुलढाणा पोलीस करत असून आमच्या शिलेदारांना अटक केली आहे. आंदोलन चिरडण्याचा प्रयत्न सरकार करत आहे. असे मत शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

यावेळी ते म्हणाले की, रात्री झोपेतून उठवून फरफटत पोलिस स्टेशनला आणलेले आहे. आम्ही दरोडेखोर, दहशतवादी आहोत का?असा प्रश्न यावेळी त्यांनी केला. संविधानाने आम्हाला आंदोलन आणि सत्याग्रह करायचा अधिकार दिला आहे. आम्ही कुठेही कायदा हातात घेणार नाही. पोलिस विनाकारण त्रास देत असून, गाडीच्या मालकाला चालकाला सुद्धा अटक केली आहे. कुटुंबातील सदस्यांना सुद्धा त्रास देण्याचे काम पोलिसं करत आहेत. माझ्यावर काय कारवाई करायची ते करावी. पोलिसांची दादागिरी खपवून घेतली जाणार नाही, मी मुंबईमध्ये पोहचलो आहे. आणि सहकाऱ्यांना घेऊन आंदोलन करणार आहे. दुसरीकडे राज्यात अवैध धंदे सुरू आहेत. दरोडे पडतात, खून होतात, त्यांना अटक करायला फुरसत नाही. तिथे पोलिस अपयशी ठरत आहेत. शेतकऱ्यांसाठी आंदोलन करणाऱ्यांना दडपशाही करत असला तर खपवून घेतल्या जाणार नाही, आंदोलन चिरडण्याचा प्रयत्न सरकार करत आहे. कितीही आंदोलन दडपण्याचा प्रयत्न केला तरीही सत्याग्रहावर ठाम आहे. अशी प्रतिक्रिया शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी दिली.

### आयटीआय चिखली येथे निरुपयोगी साहित्यांचा लिलाव

**बुलढाणा/प्रतिनिधी :** शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, चिखली येथे निकामी व कालबाह्य यंत्रसामग्री, हत्यारे आणि अवजारे इत्यादी निर्लेखित साहित्याचा लिलाव केला जाणार आहे. यासाठी इच्छूकांकडून सिलबंद निविदा मागविण्यात आल्या आहेत. संबंधित साहित्याची यादी आणि पाहणी दिनांक १७ मार्च पासून कार्यालयीन वेळेत उपलब्ध करण्यात आली असून साहित्याच्या संख्येत बदल करण्याचे तसेच निविदा नाकारण्याचे सर्वाधिकार संस्थेच्या प्राचार्यांनी राखून ठेवले आहेत. इच्छुकांनी आपली मोहोरबंद निविदा दि. २६ मार्च रोजी सायंकाळी ४ वाजेपर्यंत संस्थेच्या निविदा पेटीत टाकावी. त्यानंतर आलेल्या निविदा स्वीकृत केल्या जाणार नाहीत. निविदेसंबंधी अटी व शर्ती कार्यालयात उपलब्ध आहेत. तसेच निविदा अर्जासाठी १०० रुपये रोख भरून तो निश्र्चित कालावधीत प्राप्त करुन घेण्याचे आवाहन प्राचार्य जि.एस. भावले यांनी केले आहे.

# नागपुरात औरंगजेबचे समर्थकांनी अफवा फैलावत वातावरण पेटवले

## विश्व हिंदू परिषदेची पत्रकार परिषद

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** औरंगजेबचा कबर हटवण्यासाठी राज्यभर आंदोलन करण्यात आले. फक्त नागपुरात औरंगजेबचे समर्थकांनी अफवा फैलावत वातावरण पेटवले, असा आरोप विश्व हिंदू परिषदेच्या पदाधिकार्यांनी पत्रकार परिषदेत केला.



विश्व हिंदू परिषदेच्या पदाधिकारी पत्रकार परिषदेत म्हणाले की, हिंसा करणर्या सर्वांवर कडक कारवाई झाली पाहिजे. छत्रपती संभाजी महाराजांवर अत्याचार करणाऱ्या औरंगजेबाच्या नावानुसार महाराष्ट्रात राहू नये, औरंगजेबला मानणारा वर्ग अजूनही नागपुरात आहे. कालच्या घटनेवरून दिसून आले आहे. आज पालकमंत्री यांनी पोलीस आयुक्त यांची भेट घेतली. काल जहादींनी औरंगजेबला आदर्श म्हणून, तोडफोड केली हे सगळं एका प्लॅनिंगचा भाग आहे. आंदोलनानंतर आमचा विषय संपलेला होता. मात्र, संध्याकाळी कट रचून या घटनेला रूपं दिले गेले. ज्यांनी या संपत्तीचे नुकसान केले, ज्यांच्यावर गुन्हे दाखल होणार, तोडफोड केली त्या सगळ्या लोकांचे घराची विक्री करून हिंदू समाजाच्या लोकांचे नुकसान झाले, गाडीची जाळपोळ झाली त्याची भरपाई करून द्यावी. जर असं झाले नाही तर, आम्ही आमच्या पद्धतीने आंदोलन करू असा इशाराही विश्व हिंदू परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी दिला. औरंगजेबाची कबर हटवण्यात यावी,या मागणीसाठी आंदोलन करणार होतो, त्यामध्ये कारसेवेचाही सर्वात शेवटचा टप्पा होता. संघ मुख्यालय घटनास्थळ जवळच रात्रभर हिंदू समाजाचे कार्यकर्ते त्या परिसरातील होते. बजरंग दलाचे कार्यकर्ते त्यांना त्या स्थळापर्यंत पोहोचू देणार नाही. आम्ही मोर्चा काढला त्यावरून गुन्हे दाखल झाले असते तर आम्हाला मान्य होते आम्ही संविधानाने चालणार आहोत. पण त्यांनी जाळपोळ केली ते संविधान मानणारे नाहीत, असा आरोप यावेळी विश्व हिंदू परिषदेच्या पदाधिकार्यांनी आयोजित पत्रकार परिषदेत केला.

### नागपुरात हिंसाचार, विधीमंडळाच्या पायऱ्यांवर सत्ताधारी-विरोधक आमनेसामने

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्याची उपराजधानी असलेल्या नागपुरात दोन गटामध्ये सोमवारी रात्री हिंसाचार उफाळून आला. त्याचे पडसाद आज विधीमंडळाच्या आवारात दिसून आले. विरोधकांनी हिंसाचाराच्या विरोधात सुरू केलेल्या आंदोलनाला सत्ताधाऱ्यांनी औरंगजेबाच्या कबरीवरून आंदोलन सुरू केले. विरोधकांनी प्रक्षोभक वक्तव्ये करणाऱ्या नितेश राणे यांच्यावर कारवाईची मागणी केली आहे. तर, त्यापुढे सत्ताधारी आमदारांनी आंदोलन सुरू केले.

नागपुरातील महाल भागात सोमवारी संध्याकाळी तरुणांच्या दोन गटांमध्ये झालेल्या वादानंतर जोरदार दगडफेक आणि जाळपोळीची घटना घडली. महाल परिसरामध्ये वाहनांची तोडफोड करून जाळपोळ करण्यात आली. घटनास्थळी वेळीच पोलीस आणि दंगल विरोधी पथक दाखल झाले. औरंगजेबची कबर हटवण्यात यावी या मागणीसाठी राज्यभरात विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाने आंदोलन पुकारले होते.

# ग्रंथोत्सवाचा उत्साहात शुभारंभ ; ग्रंथदिंडी, परिसंवादाद्वारे वाचन संस्कृतीचा जागर !

## साहित्यिक अर्चना देव यांच्या हस्ते ग्रंथोत्सवाचे उद्घाटन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयातर्फे आयोजित दोन दिवसीय ग्रंथोत्सवाचा मोठ्या उत्साहात शुभारंभ करण्यात आला. शहरातील गर्दे वाचनालयाच्या सभागृह येथे आयोजित या ग्रंथोत्सवाचे उद्घाटन साहित्यिक अर्चना देव, जिल्हा ग्रंथालय अधिकारी डॉ. राजेश पाटील यांच्या हस्ते मंगळवारी झाले.

यावेळी शिक्षणाधिकारी अनिल आकाळ, बाबासाहेब वरणगावकर, उदय देशपांडे, डॉ. किं.वा.वाघ, डॉ. राजेंद्र गणगे, नेमिनाथ सातपुते, अनंत सातव, विष्णू इंगळे, उमेश ढगे यांच्यासह जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयातील कर्मचारी शालेय विद्यार्थी उपस्थित होते.

या ग्रंथोत्सवासाठी उपस्थित झालेल्या मान्यवरांनी मनोगत केले. यात त्यांनी आधुनिकतेच्या दिशेने वाटचाल करतांना ग्रंथ, पुस्तक वाचन संस्कृती जोपासण्याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले.

ग्रंथदिंडी उत्साहात

ग्रंथोत्सवाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते ग्रंथपूजन करुन शहरातील हुतात्मा स्मारकापासून ते गर्दे वाचनालयापर्यंत ग्रंथदिंडी काढण्यात आली. या ग्रंथदिंडीचे उद्घाटन साहित्यिक अर्चना देव यांच्या हस्ते सकाळी करण्यात आले. या ग्रंथदिंडीत महिला, शाळकरी विद्यार्थी, अधिकारी व कर्मचारी, सहभागी झाले होते. या ग्रंथदिंडीत कीर्तन, पारंपरिक फुगडी खेळांचे सादरीकरण करण्यात आले. यासह सहभागी महिलांनी फुगडीचा देखील आनंद घेतला.

ग्रंथविक्री, प्रदर्शनी व बहुरंगी कार्यक्रम

हा ग्रथोत्सव दि. १८ व १९ मार्चपर्यंत आयोजित करण्यात आला आहे. या ग्रंथोत्सवात वाचन संस्कृतीचा प्रचार आणि प्रसार होण्यासाठी ग्रंथप्रदर्शन, ग्रंथविक्री, कविसंमेलन, व्याख्याने, तसेच विविध बहुरंगी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून वाचनप्रेमी, पुस्तकप्रेमींनी ग्रंथोत्सवात सहभागी होवून लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

अभिजात मराठी भाषा आणि आपली जबाबदारी या विषयावर आधारित परिसंवाद देखील आयोजित करण्यात आले. यात डॉ. एस. एम.कानडजे यांनी व्याख्यानाद्वारे मराठी भाषेचे महत्व विषद केले. या परिसंवादामध्ये डॉ. कि.वा. वाघ, सुनिल वायाळ, नेमिनाथ सातपुते सहभागी झाले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.निशिकांत ढवळे यांनी तर आभार प्रदर्शन गजानन कुरवाडे यांनी केले.

या ग्रंथोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी दि. १९ मार्च रोजी सकाळच्या सत्रात कृत्रीम बुद्धीमत्तेचा वाचन संस्कृतीवर होणारा परिणाम, वाचन चळवळीमध्ये सार्वजनिक ग्रंथालयांचे योगदान या विषयावर परिसंवाद तर दुपारच्या सत्रात कवि संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानंतर या दोन दिवसीय ग्रंथोत्सवाचा समारोप कार्यक्रम होईल. या ग्रंथोत्सवात नागरिकांनी सहभागी होण्याचे आवाहन ग्रंथोत्सव जिल्हा समन्वय समितीच्या वतीने करण्यात आले आहे.